नागपूर महानगरपालिकेची स्थगित सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक ०८/०९/२०२१ रोजी सकाळी ११.५५** वाजता महानगरपालिकेच्या मुख्यालयातील स्व. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृह, मनपा येथून मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि(१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजिक केलेल्या सभेचे कार्यवृत्त.**

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ४. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| ५. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| ६. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| ७. | ५ | अ | रिक्त | |
| ८. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| ९. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| १०. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| ११. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| १२. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| १३. | ८ | ब | रिक्त | |
| १४. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| १५. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| १६. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| १७. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| १८. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| १९. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् |
| २०. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| २१. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| २२. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| २३. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| २४. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| २५. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| २६. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| २७. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| २८. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| २९. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| ३०. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ३१. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| ३२. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ३३. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| ३४. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| ३५. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| ३६. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ३७. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| ३८. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| ३९. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ४०. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ४१. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ४२. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ४३. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ४४. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ४५. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ४६. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| ४७. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| ४८. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ४९. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ५०. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| ५१. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ५२. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ५३. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ५४. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ५५. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ५६. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ५७. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ५८. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ५९. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ६०. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |

## अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| २. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| ३. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ४. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ५. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ६. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ७. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| ८. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| १०. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| ११. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| १२. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| १३. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १४. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| १५. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| १६. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| १७. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १८. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| १९. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| २०. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| २१. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| २२. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| २३. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| २४. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| २५. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| २६. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| २७. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| २८. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| २९. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ३०. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ३१. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| ३२. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| ३३. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ३४. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ३५. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ३६. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ३७. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ३८. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ३९. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ४०. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ४१. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ४२. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ४३. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ४४. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ४५. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ४६. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ४७. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ४८. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ४९. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ५०. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ५१. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५२. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ५३. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ५४. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ५५. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ५६. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ५७. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ५८. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ५९. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ६०. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| ६१. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ६२. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ६३. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ६४. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ६५. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ६६. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ६७. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ६८. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ६९. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ७०. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ७१. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| ७२. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ७३. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ७४. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ७५. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ७६. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ७७. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| ७८. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| ७९. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| ८०. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| ८१. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ८२. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| ८३. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ८४. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ८५. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ८६. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ८७. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ८८. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ८९. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| ९०. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| ९१. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| ९२. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| ९३. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| ९४. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९५. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| ९६. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी. निगम आयुक्त**

**डॉ.रंजना लाडे निगम सचिव**

मा. महापौर यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

**वंदेमातरम होवून सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली.**

**(मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधान प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले)**

**ठराव क्रमांक १४८ :- मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.**

## अभिनंदन प्रस्ताव

### सिध्दार्थ रॉय

नागपूरकर युवा लेखक सिध्दार्थ रॉय यांचा केंद्र सरकारच्या राष्ट्रीय युवा पुरस्काराने (सन २०१८-१९) गौरव करण्यात आला. महाराष्ट्रातून संबंधित वर्षसाठी सन्मानित झालेला तो एकमेव तरुण आहे. सिध्दार्थने शालेय जीवनापासूनच पुस्तक लेखन सुरु केले होते व त्याच्या योगदानासाठी त्याला सन्मानित करण्यात आले याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### रवींद्र कासखेडीकर

रस्ता सुरक्षा आणि वाहतूक नियमांसंदर्भात जागृती करण्याचे व्रत घेतलेल्या जन आक्रोश संस्थेचे सचिव रवींद्र कासखेडीकर यांची भारत सरकारच्या राष्ट्रीय रस्ते सुरक्षा परिषदेवर नियुक्ती करण्यात आल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

### आयुषी खेडकर

आयुषी नितीन खेडकर हिने फायटर पायलट होण्याचा बहुमान पटकावत पाथर्डीचा झेंडा अटकेपार फडकविला आहे. देशभरातून निवडल्या गेलेल्या ६१ जणांमध्ये तिचा समावेश असून ती अहमदनगर जिल्हयातील पहिलीच महिला फायटर पायलट ठरली आहे. त्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>राजेन्द्रकुमार तिवारी</u>**

नक्षल्यांचे कर्दनकाळ एन्काउंटर स्पेशालिस्ट सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक राजेन्द्रकुमार तिवारी यांना गुणवत्तापूर्ण सेबेबद्दल राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>टोकियो ऑलीम्पीक व पॅरा ऑलीम्पीक स्पर्धेतील पदक विजेते व पंच</u>**

भारताने टोकियो ऑलीम्पीक स्पर्धेत १ सुवर्ण, २ रौप्य व ४ कांस्य पदकासह विविध पदके प्राप्त केली आहे. भारतीय पुरुष हॉकी संघाने उत्कृष्ठ कामगिरी करत कांस्य पदक प्राप्त केले आहे. तसेच भारतीय महिला हॉकी संघाने देखील चांगली कामगिरी करुन चौथे स्थान पटकाविले. मात्र कांस्य पदक थोडक्यात हुकले.

त्याचप्रमाणे पॅरालिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंनी ५ सुवर्ण, ८ रौप्य व ६ कांस्य पदके प्राप्त करुन घवघवीत यश संपादन केले आहे. प्रतिकुल परिस्थितीत अपंगत्वावर मात करीत या खेळाडूंनी पॅरा ऑलीम्पीक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

ऑलीम्पीक स्पर्धेत टेबल टेनीस या क्रीडा प्रकारात पंच म्हणून भारतातून नागपूरचे मंगेश मोपकर यांची एकमेव निवड झाली व त्यांनी चांगली कामगिरी पार पाडली. तरी भारताचा नांव लौकीक वाढविल्याबद्दल उपरोक्त सर्व ऑलीम्पीक, पॅरा ऑलीम्पीक गुणवंत खेळाडूंसह पंच मंगेश मोपकर या सर्वांचे नागपूर मनपाची ही सभा विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**प्रवीण टाके योगेश पांडे / अंजया अनपार्थी /**

पत्रकारितेच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी राज्य शासनाच्या वतीने दिले जाणारे २०१९ वर्षासाठीचे पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे (मराठी) या पुरस्कारामध्ये शासकीय गटात .नागपूरचे जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके यांना राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण पुरस्कार, दैनिक टाईम्स ऑफ इंडिया नागपूरचे विशेष प्रतिनिधी अंजया अनपार्थी यांना राज्यस्तरीय अनंत गोपाळ शेवडे (इंग्रजी) पुरस्कार तर दैनिक लोकमतचे उपमुख्य उपसंपादक योगेश पांडे यांना विभागीय स्तरावरील ग.त्र्यं.माडखोलकर (मराठी) पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा या सर्वांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

महापौर:- प्रश्नोत्तराला सुरवात करण्यात येते.

<u>प्रश्न क्र. 258</u>:- दुर्बल घटक योजने अंतर्गत मागील सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या चार वर्षाकरिता किती निधी मनपा बजेट मध्ये उपलब्ध करण्यात आला होता. या संदर्भात प्रश्न

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, मा.आयुक्त, मा.सदन. दिनांक 22.07.2021 ला मागील सभागृहामध्ये दुर्बल घटक योजने अंतर्गत मागील सन 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-21 या चार

वर्षाकरिता प्रत्येक वर्षी किती निधी मा. नगरसेवकांच्या प्रस्तावित कामांकरिता खर्च करण्यात आला, किती निधी अखर्चिक राहिला त्याचा उप प्रश्न असा होता मा.महापौरजी, हा अखर्चिक निधी किती वर्षी कॅरीफॉरवर्ड करुन खर्च करण्यात आला. तिसरा उपप्रश्न होता, दुर्बल घटक अंतर्गत मनपा बजेट अंतर्गत प्रत्येक वर्षी कां खर्च करण्यात येत नाही. मला याचे उत्तर मिळाले होते ते असमाधानकारक होते. कारण की 87 559.77 लक्ष रुपये खर्च करण्यात आले नाही. या अनुषंगाने शासनाचा जे जी.आर. आहे त्या जी.आर.चे अधिका-यांनी वाचन करावे. महाराष्ट्र शासनाचा जी.आर. काय म्हणतो आहे त्या जी.आर.च्या अंतिम पॅराचे वाचन करण्यात यावे.

महापौर:- आपण जी.आर. ची तारीख आणि नंबर सांगितला तर जास्त बरे होईल. प्रशासनाने जी.आर.चे वाचन करावे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, शासन परिपत्रक 3 जुलै 1982 चे वाचन करावे. शासन आदेश नंबर बीसीसी 1078/2666/ 10 दिनांक 08.9.1978 प्रमाणे देण्यात आलेले आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.कोल्हे) :- मा.महापौरजी,( परिपत्रकाचे वाचन केले)

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, पुर्ण परिपत्रक वाचण्याची गरज नाही. शासनाचा जी.आर.आहे, नगरपालिकेच्या संबंधित पाठीमागच्या पॅराचे वाचन करण्यात यावे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.कोल्हे) :- मा.महापौरजी,( वाचन केले)

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, मागील चार वर्षामध्ये 87559.77 लक्ष रुपये अखर्चिक राहिलेला आहे. तो 2021-22 च्या अर्थसंकल्पामध्ये कॅरीफारवर्ड कां केला गेलेला नाही.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी(श्री.कोल्हे) :- मा.महापौरजी, या संदर्भात 2017-18 पासून माहिती काढलेली आहे. यामध्ये एकुण महसुली खर्च त्यामधून वजा बांधील खर्च असे करता मागील पाच वर्षामध्ये ॲकच्युअली 96.52 कोटी खर्च होता त्याप्रमाणे ॲकच्युअली जास्तीची तरतूद 219 कोटी ठेवण्यात आली होती. त्याचे कार्यदेश देण्यात आलेले आहे 96.52 कोटी पैकी 97.56 कोटी म्हणजे आपण जास्तीचा खर्च केलेला आहे. या कार्यादेशामध्ये या वर्षीचे जे कार्यादेश होत आहेत त्याचा सहभाग नाही. म्हणजेच आपण ॲकच्युअली देय असलेल्या निधी पेक्षा जास्तीचा निधी देण्यात आला आहे असे आजच्या फिगरवरुन दिसून येत आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, यांनी प्रत्येक वर्षी त्या त्या हेडमध्ये यांनी पैसा ठेवलेला आहे तो तो पैसा जसे की प्राथमिक आणि माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, मागासवर्गीय वस्तीमध्ये विद्युत खांबे, अध्ययन कक्षाची निर्मिती या साठी प्रत्येक हेडमध्ये पैसा दिलेला आहे. 5 टक्के बजेटच्या राशीमधून जातो आणि कॅरीफारवर्ड करुन तो खर्च करण्याचा शासनाचे निर्देश आहे. तो खर्च केलाच पाहिजे. जर तो खर्च अधिकारी वर्ग करीत नसेल तर जबाबदार कोण ? यामध्ये उद्यान विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन सानुग्रह, विद्युत विभाग, समाज विकास विभाग, अध्ययन कक्ष, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग नागपूर या सर्व विभागाच्या माध्यमातून हा खर्च करायला पाहिजे. परंतु हा खर्च करीत नाही आहे. दुर्बल घटक समितीच्या माध्यमातून हा खर्च करायला पाहिजे. दुर्बल घटक समिती यांचे मार्फत खर्च वाटप करणे, प्राप्त पत्रानुसार

प्राकलन तयार करणे, आदेशित प्रक्रिया नुसार कार्यदेश होत असल्यामुळे चालू किंवा पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यात येतो. दुर्बल घटक समिती अंतर्गत पुर्ण राशी खर्च होत नाही. कां खर्च होत नाही. जर तो खर्च होत नसेल तर कॅरीफारवर्ड करण्याकरिता मागणी कां केली गेली नाही.

महापौर:- प्रशासनाच्या माध्यमातून जे निवेदन करण्यात आले त्यात त्यांनी नमुद केले आहे. 5 टक्के ठेवण्याकरिता काय निकष आहेत, महानगरपालिकेने अनेक खर्च केलेले आहे. ते मॅडेटरी खर्च आहेत. ते वजा करुन उरलेल्या रक्कमेच्या 5 टक्के त्याप्रमाणे 5 टक्के रक्कम ठेवली आहे. 2017-18 पासून आजपावेतो 96.52 टक्के खर्च पैकी 97.56 कोटी म्हणजे आपण जास्तीचा खर्च केलेला आहे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, मा.महापौरजी, बीएसयुपी किंवा घरकुल योजना या अंतर्गत शासनाचा निधी त्या अंतर्गत लावला जातो. या विकास निधी मध्ये शासनाचा निधी त्यामध्ये लावला जात नाही. तर संपुर्ण बजेटच्या 5 टक्के निधी जो दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत दलित वस्तीमध्ये खर्च करायला पाहिजे तो त्यामधून वजा करण्यात येत नाही. केंद्र व राज्य शासनाच्या स्पष्ट सुचना असतांना समाजातील दुर्बल घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी मनपा प्रशासनाकडून हा निधी खर्चच करण्यात येत नाही. 1930-31 च्या राऊन्ड टेबल बैठकीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी या समितीचे सदस्य होते. संपुर्ण भारतामध्ये एस.सी. एस.टी.च्या जाती सीमीत करण्यात आल्या. यानंतर 1935 च्या सेंकड ईंडिया ॲक्टमध्ये त्यांना अंतभुत करण्यात आले आणि भारतीय संविधाना अंतर्गत दुर्बल घटक योजनेचा भारतातील आर्थिक आणि सामाजिकदृष्टया दुर्बल असलेल्यांना त्यांचे नुकसान होवू नये म्हणून पुढे संविधानातच या निधीची भरीव तरतूद करण्यात आली.

महापौर:- घोडेस्वारजी आपण लोकसभेसारखे येथे वाचन करु नका. नेमके विषयवस्तुवर बोलावे.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, दुर्बल घटक समिती गठीत करण्यात आली आणि त्या अंतर्गत तो खर्च आवंटीत करण्यात आला तो खर्च करायला पाहिजे तो खर्च कां करण्यात आला नाही.

(बेल)

महापौर:- सभा संचालन करतांना जे निर्देश देण्यात येत आहेत त्याचे जर आपण पालन करीत नसाल तर आपणांस म्युट करण्यात येईल. तुम्ही तोंड बंद करणार नाही आणि सभागृहाचे निर्देश जर ऐकणार नाही. तर तुम्हांला म्युट करण्यात येईल.

श्री.जितेंद्र घोडेस्वार:- मा.महापौरजी, मागच्या सभागृहामध्ये आपण दिलेल्या निर्देशाप्रमाणे हा प्रश्न पुढच्या सभागृहामध्ये ठेवण्याविषयी आपणच सांगितले. मला माझ्या प्रश्नाचे पुरेसे उत्तर देण्यात आले नव्हते म्हणून पुढच्या सभागृहामध्ये पुरेसे उत्तर देण्याविषयी हा प्रश्न घेण्याविषयी सांगण्यात आले. आता सभागृहाने माझ्या प्रश्नाचे पुरेसे उत्तर दयावे.

महापौर:- सभागृहाने दिलेले उत्तर पुरेसे आहे.

श्री. जितेंद्र घोडेस्वार:- मा.नगरसेवक का उत्तर देने के लिए सभागृह नही है तो हम प्रशासन और शासन का निषेध करते है।

श्री. इब्राहीम टेलर:- बहुजन समाज पार्टी के तरफ से इस सभागृह का हम निषेध करते है।

**प्रश्न क्र. 266**:- आसीनगर झोन अंतर्गत मलवाहिनेचे अद्याप कार्यादेश न झाल्यामुळे ठिक ठिकाणी चोकेज संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त:- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र. 267**:- भांडेवाडी डम्पिंग यार्ड प्रत्येक बारीश मे कचरा का बास संदर्भात प्रश्न

श्री.राजकुमार साहू:- मा.महापौरजी, मेरा प्रश्न था की भांडेवाडी डम्पिंग यार्ड मे प्रत्येक वर्ष बारीश मे कचरा का बास आता है वह असहनीय होता है। और लाखो लोगो के स्वास्थ्य के साथ खिलवाड होता है। मुझे जो उत्तर मिला है वह अपुर्ण है उससे मै सहमत नही हूँ। पुरी प्रोसेसिंग की जाती है फिर भी इतनी बास आती है की हम रात भर सो नही पाते है। खरबी, भरतवाडा,वर्धमाननगर, वाटोळा यह जो एरिया है यहां के लाखो लोगो के स्वास्थ्य से खिलवाड हो रहा है। जो मुझे उत्तर मिला है वह अपुर्ण रहने के वजह से प्रशासन ने उत्तर देना चाहिए ऐसा मेरा निवेदन है।

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):- मा.महापौरजी, नागपूर शहरात साधारणत: 1000 ते 1100 टन प्रति दिवस कचरा निर्मिती होते. भांडेवाडी येथे कचरा संकलन करुन त्या ठिकाणी आपण ही प्रक्रिया राबवितो. आपण काही प्रमाणात 100 टक्के जो कचरा गोळा होतो....

श्री.राजकुमार साहू:- मा.महापौरजी, प्रशासन से यह पुछना है की जब फवारणी करते है और कचरे की विल्हेवाट लगाई जाती है तब ही वहां पर जो बास आती है उससे लाखो लोगो के स्वास्थ्य् के साथ खिलवाड हो रहा है। यह जो उत्तर दे रहे है वह ऐसा है की हम यह कर रहे है, हम वो कर रहे है। जो बॉयोवेस्ट है उसकी भी विल्हेवाट लगाई जाती नही। और जब फवारणी करते है तो फवारणी करने के बाद भी बास क्यु आती है।

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, मला बोलण्याची परवानगी दयावी. आपल्या डम्पिंग यार्ड मध्ये गेल्या काही दिवसापासून बॉयोमायनिंग सुरु आहे. या बॉयोमायनिंग प्रकल्पात काय काम करावयाचे होते, त्याला आपण कधी देणार होतो आणि किती पैसे देणार होतो. सध्या कामाची काय स्थिती आहे ते मा.महापौरजी यांच्या माध्यमातून प्रशासनाकडून माहिती देण्यात यावी.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):- मा.महापौरजी, बॉयोमायनिंग काम आपण.......संस्थेला दिले आहे. सध्या त्या ठिकाणी डम्पिंग होत आहे त्याच्या बाजूला जी जागा आहे

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, किती दिवसात हे काम सुरु होणार आहे, किती दिवसात हे काम पुर्ण होणार आहे. एक ट्रक मागे त्याला किती पैसे देतो आणि सध्या आज या कामाची काय स्थिती आहे याची माहिती देण्यात यावी.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):- मा.महापौरजी, दोन वर्षापूवी हा प्रकल्प दिला आहे. 3 वर्षाचा

कार्यकाल त्या कंत्राटदाराला दिला आहे. 10 लाख टन त्याला बॉयोमायनिंग करावयाचा होता त्यातला 4.5 लाख टन कचरा बॉयोमायनिंग त्याने आतापर्यंत केलेला आहे. 1015 रुपये प्रति टन प्रमाणे त्याला बॉयोमायनिंग करिता दिलेले आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, आता उरलेला 6.5 लाख टन त्याला बॉयोमायनिंग करावयाचा आहे. हे त्याला दिलेल्या कालावधीत होणार नसेल तर त्याला एक्स्टेंशन मिळणार आहे. मा.महापौरजी, बॉयोमायनिंग चे जे टेंडर झाले होते माझ्या माहितीप्रमाणे सांगतो, ती खरी आहे काय माहीत नाही परंतु तुम्हांला सांगतो. प्रशासनाने ते तपासून घ्यावी, या टेंडरला टेंडर होण्याआधी प्रशासकीय मान्यता नव्हती अशी माझी माहिती आहे. येथे कुणी प्रशासनाचे प्रतिनिधी आहेत काय? जे उत्तर देवू शकतील.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):- मा.महापौरजी, मी माहिती घेवून सांगतो सध्या ती माहिती माझ्याकडे नाही.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, सध्या स्मार्ट सिटीच्या माध्यमातून कच-याच्या प्रोसेसिंगचे टेंडर मिळाले आहे काय? त्या कंत्राटासाठी किती रुपये देणार आहे.

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):- मा.महापौरजी, स्मार्ट सिटीच्या माध्यमातून बॉयोमायनिंगचे टेंडर दिलेले होते त्याला 788 करोड देणार आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, हे आपल्या समोर आहे. महानगरपालिकेने काढलेले टेंडर हे 1015 करोडचे आहे आणि माझ्या माहितीप्रमाणे हे टेंडर थोडया उशिरा काढले ते 740 करोडचे आहे. एकच कंपनी काम करीत आहे. म्हणून या सगळया प्रकरणाची चौकशी व्हायला पाहिजे. कारण एक टेंडर 1015 करोडचा आहे आणि दुसरा टेंडर 740 करोडचा झाला आहे. या दोन्ही निविदेची आपल्या स्तरावर चौकशी व्हायला पाहिजे मा.महापौरजी. 1015 करोडचा टेंडर आहे त्यामध्ये महानगरपालिकेचा शेअर किती आहे. मा.महापौरजी, माझ्या प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे.

श्री.तानाजी वनवे:- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, दटके साहेबांनी जो प्रश्न या ठिकाणी मांडलेला आहे. तो अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. एकच कंपनी दोन्ही ठिकाणी काम करीत आहे. त्या कंपनीचे काम समाधानकारक नाही म्हणून त्यांनी चौकशीची मागणी केलेली आहे. या मागणीला माझा पुर्ण पाठिंबा आहे.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, मला कुठलाही आरोप करावयाचा नाही हे मी स्पष्ट करतो मला हे फक्त तपासावयाचे आहे. 1015 मध्ये महानगरपालिकेचा किती शेअर आहे आणि आपल्याला राज्य सरकारकडून जे पैसे आले आहे मा.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतांना स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत त्याच्यात महानगरपालिकेचा शेअर किती ?

श्री.तालेवार(अधिक्षक अभियंता):- मा.महापौरजी, शासनाकडून 1015 करोड मध्ये शासनाकडून कुठलाही पैसा मिळालेला नाही.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, 1015 मध्ये शासनाकडून कुठलाही पैसा आलेला नाही. स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत मा.हर्डीकर साहेब असतांना 90 कोटी रुपये आले होते. ते 90 कोटी रुपये आपण या विषयावर खर्च करणार होतो. 90 कोटी रुपयाचे काय झाले याची प्रशासनाने माहिती दयावी.

महापौर:- सन्माननीय दटके साहेबांनी जो प्रश्न उचललेला आहे त्याच्यात पहिला कंत्राट आणि दुसरा कंत्राट याच्यात मोठया अमाऊंन्टची तफावत दिसत आहे. प्रशासनाने याबद्दल एक सविस्तर अहवाल तयार करावा आणि एक महिन्याच्या नंतर सभागृहात समक्ष हा अहवाल ठेवण्यात यावा असे निर्देश देण्यात येते.

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, माझी एवढीच विनंती आहे की शासनाकडून आलेल्या 90 कोटी रुपयाचे महानगरपालिकेच्या अधिका-यांनी काय केले याचेही उत्तर या अहवालात त्यांनी द्यायला पाहिजे अशी विनंती करतो.

महापौर:- त्या अहवालामध्ये या बाबींचे सुध्दा उत्तर देण्यात यावे.

श्रीमती आभा पांडे:- मा.महापौरजी, या विषयावर मा.प्रवीण दटके यांनी प्रश्न उपस्थित केला. 1015 करोडमध्ये जी कंपनी काम करीत आहे तीच कंपनी 788 करोड मध्ये सुध्दा तीच कंपनी काम करीत आहे. महानगरपालिकेची पुर्ण यंत्रणेवर हा जो प्रश्नचिन्ह उपस्थित केला. मला सुध्दा असे वाटते कारण की भांडेवाडी येथे राहणारे लोक प्रत्यक्ष माझ्याकडे डेप्युटेशन घेवून आले होते त्यांचे म्हणणे असे होते की ज्या कच-यावर प्रोसेसिंग होत नाही आणि तो कचरा तसाच पडून राहतो त्यामुळे त्या परिसरात दुर्गंध आणि मच्छरांचा प्रार्दुभाव वाढतो आणि डेंग्यु सुध्दा परिसरात सगळीकडे पसरलेला आहे. याच्यामध्ये निश्चितच एक महिन्यात अहवाल सादर करण्याकरिता सांगितले आहे ते होणार परंतु प्रश्न असा आहे की येथे राहणा-या लोकांच्या जीवाशी आपण खेळू शकत नाही. माझे निवेदन आहे की भांडेवाडी येथील कच-याची अशा पध्दतीने प्रोसेसिंग करावी की जेणेकरुन परिसरातील राहणा-या लोकांना आरोग्य विषयक समस्या उद्भवू नयेत. मा.महापौरजी, आरोग्य विषयक सगळी जबाबदारी घेणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. धन्यवाद

श्री.प्रदीप पोहाणे:- मा.महापौरजी, भांडेवाडी येथील डम्पिंग यार्ड येथे कच-याचा जो वास येतो हा जो वास आहे तो सायंकाळी 7 वाजेपासून 9 वाजेपर्यंतच्या दरम्यान येतो. त्यावेळेला कच-याच्या शिफटींगचे काम होत असते. राम जोशी साहेब बाजूला उपस्थित असतील. त्याच्या अगोदर निपाणे साहेब होते मी त्यांना दररोज फोन लावीत होतो. त्यांचा मला वॉटसअप सुध्दा येत होते. ज्यावेळी कच-यावर स्प्रे केला जात नाही त्यावेळी कच-याचा वास भडकुन येतो. डम्पिंग यार्ड तर त्या ठिकाणाहून हटणार नाही. त्या ठिकाणी प्रोसिसिंगचे काम सुरु आहे. 50 एकराचा परिसर खाली झाला आहे. माझी आपल्या वतीने एकच विनंती आहे की ज्यावेळी कच-यावर स्प्रे करण्यात येतो त्यावेळी स्प्रे चे प्रमाण वाढविले तर कच-याचा वास कमी येईल. मला अशी एक माहिती आहे की या संदर्भात कोर्टाने महानगरपालिकेला आदेश दिले होते. काही त्या परिसरातील लोक कोर्टात सुध्दा गेले होते त्या संदर्भात कोर्टाने महानगरपालिकेला आदेश दिले आहे की वास आला नाही पाहिजे ही गोष्ट खरी आहे की खोटी आहे ही माहिती प्रशासनाकडून पाहिजे आहे.

महापौर:- मा.सदस्य, श्री प्रवीण दटके यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याच्यात पहिला कंत्राट व दुसरा कंत्राट याच्यात मोठया अमाउंटची तफावत दिसत आहे, प्रशासनानी याबद्यल एक सविस्तर अहवाल तयार करावा, आणि एक महिन्यानंतरच्या सभागृहात हा अहवाल ठेवण्यांत यावा. त्याचबरोबर शासनाकडुन आलेल्या घनकचरा व्यवस्थापनाच्या पैश्याचे प्रशासनानी काय केले, अहवालामध्ये याबाबीचे सुध्दा उत्तर

देण्यांत यावे.

**प्रश्न क्र. 268**:- नागपूर शहरामध्ये किती मंगल कार्यालय संदर्भात प्रश्न

श्री.दिलीप दिवे:- मा.महापौरजी, मी जो प्रश्न विचारलेला होते त्याचे उत्तर मला प्रशासनाने पाठविले आहे ते प्रशासनाने उत्तर समाधानकारक आहे.

**प्रश्न क्र. 269**:- महानगरपालिका व्दारे प्र.क्र. १३ (अंबाझरी) मध्ये घनकचरा संकलन साठा कुठे कुठे आहे? या संदर्भात प्रश्न

सौ.परिणिता फुके:- मा.महापौरजी, माझा प्रश्न होता की महानगरपालिकेद्वारे प्रभाग क्र. 6 मध्ये घनकचरा संकलन साठा कुठे कुठे आहे. या संदर्भात प्रश्न विचारला आणि त्यावर जे उत्तर मिळाले आहे ते समाधानकारक नाही. जे उत्तर देण्यात आले, कच-याचे जे संकलन होते ते सुदामनगरी येथे शासकीय शौचालयासमोर होते. या अनुषंगाने मला प्रशासनाला विचारावयाचे आहे की याची मंजुरी कधी कोणाकडून घेण्यात आली होती. त्या संदर्भात त्यांनी उत्तर मला दिले की हे कचरा संकलन करण्याकरिता तात्पुरती व्यवस्था केलेली आहे. परंतु ही तात्पुरती व्यवस्था त्यांनी कुणाला विचारुन केली आहे. मला प्रशासनाद्वारे याचे उत्तर हवे आहे की सुदामपुरी येथे कचरा संकलनासाठी मंजुरी कुणाकडून घेतली होती आणि माझ्या प्रभागात जितकेही कलेक्शन पाईंट केले आहेत हे कुणाला विचारुन केले आहे आणि त्याची रेग्युलर साफसफाई जबाबदारी कुणाकडे आहे. त्याचा रेकार्ड कोण मेंटेन्ट करतो आहे याचे उत्तर प्रशासनाने दयावे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री. राजेश भगत(उपायुक्त):- मा.महापौरजी, संबंधित नगरसेवकांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे. आपण संकलन केंद्र जेव्हा तयार केले आहेत तेव्हा ते झोन स्तरावरच मागितले होते. यापूर्वी या झोनमध्ये पाच ठिकाणी केंद्र होते. काही ठिकाणी विरोध झाल्यामुळे आजच्या तारखेला दोन ठिकाणी कचरा संकलन केंद्र आहेत. सुदामनगरी आणि बँक कॉलनी हे तात्पुरत्या स्वरुपाचे संकलन केंद्र असल्यामुळे याची मंजुरी घेण्यासाठी सभेत ठेवण्यात आलेले नाही. झोन स्तरावरुन हे संकलन केंद्र त्यांनी तयार केलेले आहे.

महापौर:- त्यांचा दुसरा प्रश्न आहे की त्या ठिकाणी नियमित साफसफाई कां होत नाही. त्या ठिकाणी नियमित साफसफाई झाली असती तर नगरसेवकांनी प्रश्न उपस्थित केला नसता. त्यांचा तिसरा प्रश्न आहे की त्याचे काय नियोजन आहे आणि काय व्यवस्था आहे ते सांगावे.

श्री. राजेश भगत(उपायुक्त):- मा.महापौरजी, या संकलन केंद्रावर जो कचरा जमा होतो तो व्हेयिकल टू व्हेयिकल कचरा संकलीत होतो, जमिनीवर कचरा टाकल्या जात नाही. कचरा रेग्युलर क्लिअर होतो. व्हेयिकल टू व्हेयिकल कचरा संकलन होत असल्यामुळे त्या ठिकाणी ढिगारे होवून कचरा जमा होत नाही..

सौ.परिणिता फुके:- मा.महापौरजी, अगदी चुकीचे आहे. तुम्ही येवून त्या स्पॉटला बघावे. व्हेयिकल टू व्हेयिकल कचरा संकलन होत असेल परंतु त्या ठिकाणी कचरा जमा झालेला आहे. व्हेयिकल उभे असतात त्या ठिकाणी कॅम्पस मेन रोडच्या साईडला असा विचित्र सीन दिसतो की असे वाटत नाही की हा एक चांगला एरियाचा भाग आहे. तसेच त्याच्या बाजूला शौचालय सुध्दा आहे. जर कुणाला शौचालयाचा वापर

करण्यासाठी जायचे असेल तर त्याला त्रास होत असतो इतका कचरा साठलेला असतो. यांनी जितके कचरा कलेक्शन पाईंट डिसाईड केले तेव्हा नगरसेवकांना कां सांगितले नाही. लोक आम्हांला विचारतात तेव्हा आम्हांला प्रश्न टाकून त्यांना विचारावे लागते. मा.महापौरजी, माझ्या प्रभागात कलेक्शन पाईंट जितके निर्माण केले आहे ते कुणाला विचारुन केले आहेत. यांनी उत्तरात असे सांगितले की एक किलोमीटरच्या लांब कलेक्शन पाईंट आहेत. हे कलेक्शन पाईंट आहेत हे घराघराला लागुन केलेले आहेत. त्या ठिकाणी दिवसभर कचरा पसरलेला असतो. यांनी जे कलेक्शन पाईंट निर्माण केले ते दोन्ही कलेक्शन पाईंट स्लम आणि सिव्हील एरियाच्या मधोमध आहेत. जे सिव्हील एरियात राहतात ते म्हणतात की आमचा एरिया स्लम डिक्लेअर कां करीत नाही. कचरा संकलन सेंटरवरती रेकार्ड मेन्टेन् कां ठेवीत नाही. जेव्हा आम्ही यांना या संदर्भात विचारतो तर ते सांगतात की गाडी येवून कचरा घेवून गेली तर त्याचा रेकार्ड कुणाकडे असतो काय? त्याचा रेकार्ड मेंटेन का ठेवण्यात येत नाही.

श्रीमती नंदा जिचकार:- मा.महापौरजी, यालाच धरुन माझा प्रश्न असा आहे. परिणिता फुके ताई यांनी विचारलेला आहे कचरा एका ठिकाणी टाकतात, माझा दुसरा प्रश्न असा होता की रस्ते झाडतात, रस्ते झाडल्यानंतर छोटया छोटया गाडयामध्ये कचरा गोळा करतात तर हा कचरा कोण कलेक्ट करतो, हा कचरा कुठे जमा होतो याचे काहीही प्लॉनिंग आपल्याकडे नाही. घरोघरी जो कचरा गोळा करतात त्याचा जर एक पाईंट असेल आणि तो नियमित स्वच्छ ठेवल्या जात नाही ही संपुर्ण शहराची परिस्थिती आहे. माझ्या घराच्या मागे गिट्टीखदान लेआऊटमध्ये रस्ते झाडल्यानंतर जे छोटया गाडयामध्ये कचरा जमा केला जातो तो त्या ठिकाणी टाकण्यात येतो. अनेकदा पेपरवाल्यांनी ती बातमी सुध्दा दिलेली आहे.

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, माझा पाईंट ऑफ असा आहे की जी कच-याच्या संदर्भात मा.सदस्या श्रीमती परिणिता फुके आणि माजी महापौर नंदाताई जिचकार यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या संबंधित आपण दोन्ही कचरा कंपन्यांची इंन्कॉयरी सुरु केली आहे आणि आपल्याला या माध्यमातून विनंती आहे, दोन्ही कंपन्यांचे टेंडर ताबडतोब रद्द करावे. नवीन लोकांना संधी देवून पुर्ण नागपूर शहरात जो त्रास होत आहे तो होणार नाही. अशी माझी मागणी आहे.

श्रीमती नंदा जिचकार:- मा.महापौरजी, माझी हीच विनंती ओ आपल्याकडे अशी पध्दत आहे की घरोघरी जो कचरा उचलला जातो तो एका ठिकाणी गोळा होतो आणि तो व्हेयिकल टू व्हेयिकल ट्रान्सफर होतो परंतु काहीच ठिकाणी ट्रान्सफर होतो. काही ठिकाणी असाच टाकला जातो त्या जागेची स्वच्छता सुध्दा बाळगल्या जात नाही आणि या डेंग्युच्या साथीमध्ये आणि या पावसाळयाच्या दिवसामध्ये ते इतके विदारक चित्र असते. परिणिता ताईने जे सांगितले ते अगदी सत्य आहे. जरी व्हेयिकल टू व्हेयिकल कचरा ट्रान्सफर केल्या जात असला तरी ती जागा स्वच्छ करण्यात येत नाही.

श्री.दिपक चौधरी:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, अनेक लोकांकडे गवत कापण्याची मशीन आहे परंतु प्रत्येक माणसाची एक गरज आहे त्याला असे वाटते की माझ्या भागातील कापलेले गवत घेवून गेले पाहिजे. त्याच्यामुळे डेंग्यु रोग पसरतो. त्यामुळे आपण एक काम केले पाहिजे, डेंग्यु रोग कशामुळे पसरतो याचे इन्र्फोमेशन पत्रकाद्वारे, वर्तमानपत्राद्वारे, जेवढे काही माध्यम असतील त्या द्वारे डेंग्यु रोग कसा पसरतो

याची माहिती दिली पाहिजे. आपल्या घरी पॉट असतील, काही कुंडया असतील. झाडे लावतो त्या झाडामध्ये स्वच्छ पाण्यामुळे डेंग्यु पसरतो.

महापौर:- दिपकजी विषय परिवर्तन होत आहे.

श्रीमती नंदा जिचकार:- मा.महापौरजी, मा.सदस्य विषय मांडत असतांना मध्येच काही कारण नसतांना पाईंट ऑफ आर्डर करुन त्यांचे भाषण मध्येच कट करणे बरोबर नाही आहे. मा.महापौरजी, रस्ता झाडल्यानंतर तो छोटया छोटया गाडयामध्ये गोळा करतात त्याची कुठलीही पध्दत नाही आहे. की त्याच्यावर शेवटी काय निर्णय लावायचा. झाडूवाले कुठेतरी तो कचरा टाकून देतात. तो कचरा परिसरामध्ये पसरला जातो. माझ्या प्रभागामध्ये गिट्टीखदान लेआऊटमध्ये ओपन स्पेसला काही प्रायव्हेट लोकांनी कुंपण टाकून ठेवलेले आहे मी जेव्हा अधिका-यांना सांगितले की ते प्रायव्हेट लोक त्या ठिकाणी कुंपण कसे काय टाकू शकतात. आधी त्या मोकळया जागेमध्ये लोक कचरा गोळा करीत होते. त्यामुळे लोक आता रस्त्यावर कचरा टाकतात. ज्यावेळी मी हेल्थ ऑफीसरला सांगितले आपली कार्पोरेशन ती जागा आहे त्या ठिकाणी प्रायव्हेटवाल्यांने कुंपण टाकलेले आहे त्या ओपन जागेमध्ये कच-यासाठी स्पॉट तयार करावे. यावर काही निर्णय घेत नसाल तर लोकांच्या आरोग्यावर परिणाम करणारा हा विषय आहे. हा मेन रोड आहे आणि मेनरोड वरती कचरा सगळीकडे पसरवून ठेवतात. त्यामुळे हाही विषय घेतला पाहिजे की रस्ता झाडल्यानंतर जो कचरा गोळा होतो त्याची विल्हेवाट कशा पध्दतीने लावायची. महानगरपालिकेचे जे ओपन स्पेस आहेत, ग्राऊंन्ड आहेत त्याचे मेंटेन्स कुणी करायचे, आज आपले जे मैदानी ग्राऊंन्ड आहेत त्याचे मेन्टेन्स कुणी करायचे आहे. त्याची स्वच्छता कुणी करायची आहे. झाडू वाले नुसता रस्ता झाडतात त्याशिवाय दुसरे काहीही करीत नाही. त्यामुळे हाही विषय लक्षात घेतला पाहिजे. मा.महापौरजी, आपण यावर रुलिंग दयावे, ज्या ही ओपन स्पेस आहेत, पियू लॅन्ड आहेत त्याची साफसफाई आणि मेन्टेन्स कुणी करायचे आहे. धन्यवाद

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. कचरा संकलनाचे नियोजन कसे काय आहे याचे उत्तर प्रशासनाने दयावे.

श्री. राजेश भगत(उपायुक्त):- मा.महापौरजी, ज्या घंटया गाडया आहेत त्याच्या माध्यमातून डोअर टू डोअर कचरा कलेक्शन करतो. रस्त्यावरील स्वच्छता करण्याकरिता त्याच्याकडे स्वतंत्र व्हेयिकल आहे. रस्त्याची साफसफाई झाल्यानंतर त्या व्हेयिकलच्या माध्यमातून त्यांना गोळा झालेला कचरा न्यावयाचा आहे.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, प्रशासनाने जे उत्तर दिले आहे ते ऑनपेपर वर सांगायला चांगले आहे परंतु ॲक्च्युअली मध्ये ते होत नाही. कचरा रस्तोरस्ती पडलेला आहे ते बघून कुणीही म्हणणार नाही की याचे व्यवस्थापन व्यवस्थित होत आहे. मला या अनुषंगाने एकच विचारावयाचे आहे की प्रभागात मनपा कर्मचा-याद्वारे रस्त्यावर विविध ठिकाणी जमा केलेला कचरा विशेषत: माझ्या प्रभागातील हाजमुल्ला दवाखाना, सेवन स्टार दवाखाना आहे, महात्मा फुले नगर, हिलटॉप, गंगा अपार्टमेंट, अखिल नगर या ठिकाणी असे भरपूर मैदाने आहेत. जेथे कर्मचा-याद्वारे कचरा जमा केला जातो. त्याची जबाबदारी कोण घेणार आहे. हा कचरा न उचलल्यामुळे आरोग्याचे प्राब्लेम जे नागरिकांना होत आहे.याची जबाबदारी कोण

घेणार आहे याचे उत्तर मला प्रशासनाने दयावे आणि कलेक्शन पाईंट डिसाईड करतांना तो कसा केला पाहिजे, कुठल्याही रस्त्याच्या पलीकडे केला पाहिजे काय? एकदम व्हिजीबल त्या ठिकाणी तो कसा सीन दिसणार आहे. त्या ठिकाणी एक टब दयावा किंवा प्रापर मॅनेजमेंट करण्यात यावे. रस्त्यावर कचरा जमा होतो मग त्या ठिकाणी कुत्रे येतात, डुकरे येतात आणि संपुर्ण रस्त्यावर कचरा पसरतो. कचरा जमा करीत असतांना त्याचे काही रुल्स् असले पाहिजे की हा कलेक्शन पाईंट आहे. या ठिकाणी इतके वाजता गाडी आली आणि कचरा उचलला गेला आहे. त्याचा रेकार्ड मेन्टन व्हायला पाहिजे. जेव्हा लोक आमच्याकडे आले तर आम्हांला त्यांना दाखविता आले पाहिजे की इतका वाजता कचरा जमा झालेला आहे आणि जमा झालेला कचरा उचलला गेला आहे. त्या रस्त्याच्या साईडवर कलेक्शन पाईंट करणार तर हे चुकीचे आहे. ज्या ठिकाणी डायरेक्ट लोकांचे लक्ष जाणार नाही किंवा एक किलोमीटरच्या डिस्टेंसवर असावे ज्या ठिकाणी नागरिक राहत नसावे त्या ठिकाणी कलेक्शन पाईंट तयार करायला पाहिजे. माझ्या प्रभागातील जितकेही छोटे छोटे कलेक्शन पाईंट आहेत ते घराला लागून असलेले कलेक्शन पाईंट आहेत आणि तो सीन अगदी वाईट आहे. माझ्या प्रभागात ताबडतोब कार्यवाही करण्यात यावी. कलेक्शन पाईंट अशा ठिकाणी शोधण्यात यावे जेणेकरुन त्याचा कुणालाही त्रास होणार नाही. यानंतर कलेक्शन पाईंट सिलेक्ट करतांना त्याचे प्रापर नियोजन करण्यात यावे जेणेकरुन रस्त्यावर कचरा येणार नाही. एवढीच माझी विनंती आहे मा.महापौरजी, धन्यवाद.

श्री. विरेंद्र कुकरेजा:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, यह पुरे नागपुर शहर का प्रश्न है। मुझे प्रशासन से जानकारी चाहिए की जो नागपुर शहर मे ट्रान्स्फर स्टेशन बनने वाले थे, जब तक ट्रान्स्फर स्टेशन बनते नही तब तक यह प्राब्लेम रहने वाली है। इसलिये मुझे इस विषय पर प्रशासन से जानकारी चाहिये।

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

डॉ.महल्ले:- मा.महापौरजी, स्मार्ट सिटी अंतर्गत अशी योजना आखली होती. त्याचे टेंडर फलोट झाले होते. टेंडर फलोट झाल्यानंतर त्यांना जागा दिली होती. जागा आपल्या मालकीची नसल्यामुळे जशजशी जागा उपलब्ध होईल त्याप्रमाणे करण्यात येईल अशी अट टाकण्यात आली होती. नंतरच्या काळात टेंडर रद्द करण्यात आले. त्यावेळी आपण ट्रान्सफर स्टेशन उभारु शकलो नाही.

श्री. विरेंद्र कुकरेजा:- मा.महापौरजी, टेंडर क्यु रद्द हुये उसके पीछे क्या कारण था इसकी जानकारी दी जाये ।

महापौर:- आयुक्तांनी निवेदन करावे.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौर महोदय, सन्माननीय सभागृह. अतिशय महत्वाच्या विषयावर आपण सभागृहामध्ये चर्चा करतो.मा. नगरसेविका मा.फुके मॅडम, मा. जिचकार मॅडम यांनी महत्वाचे प्रश्न उपस्थित केले. मी एक सांगू इच्छितो की आपली सिस्टीम काय आहे. आपल्या सिस्टीममध्ये इम्प्रुव्हमेंट करण्यास वाव आहे.

श्री.हरीश ग्वालबंशी:- मा.महापौरजी, आवाज नही आ रही है।

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी, आयुक्त महोदयांची निवेदन ऐकु येत नाही.

महापौर:- आयुक्त महोदयांना जे म्हणावयाचे ते लेखी स्वरुपात सगळया नगरसेवकांना पोहचविण्याची व्यवस्था करतो. प्रशासनाला एक निर्देश देण्यात येत आहे. सन्माननीय नगरसेविका परिणिताताई फुके, नंदाताई जिचकार या दोघींनी जो विषय उचलला, दिपक चौधरी बोलले, या सर्वांनी या विषयावर प्रश्न उपस्थित केले. आवाज सुरळित होईपर्यंत हे सभागृह स्थगित करण्यात येते.

**हस्ता /-निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**हस्ता /-महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**